महा मेट्रो

NAGPUR METRO

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

(नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

# महा मेट्रो व्यवस्थापकीय संचालक डॉ दीक्षित यांचा जागतिक परिषदेत सत्कार

## जगातील १०० रेकॉर्ड धारकांमध्ये डॉ दीक्षित यांना स्थान

## आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सतर्फे दिल्ली येथे झाला सत्कार



नागपूर: महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ ब्रिजेश दीक्षित यांचा दिल्ली येथील चौथ्या जागतिक पातळी वरील विक्रम धारकांमध्ये समावेश झाल्याबद्दल जाहीर सत्कार करण्यात आला. नवी दिल्लीच्या सिरी फोर्ट ऑडिटोरियम येथे आज (११ सप्टेंबर) झालेल्या एका जाहीर कार्यक्रमात त्यांचा सत्कार करण्यात आला. या समारंभात त्यांना मानपत्र देण्यात आले.

आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सतर्फे आयोजित `इंटरनॅशनल रेकॉर्डस् फेस्टिव्हल - २०२२' अंतर्गत झालेल्या या सोहळ्यात हा सत्कार झाला. भारताशिवाय नेपाळ, बांगलादेश, व्हिएतनाम, इंडोनेशिया, ग्रेट ब्रिटन, अमेरिका या ७ देशातील सुमारे २,५०० व्यक्तींनी या कार्यक्रमात भाग घेतला. आयोजकांप्रमाणे जागतिक पातळीवर सन्मान प्राप्त अश्या १०० विक्रम धारकांची निवड करत त्यांना या सोहळ्यात आमंत्रित केले होते.



व्यवस्थापक वर्ल्ड रेकॉर्ड युनियन कौन्सिलचे सदस्य, व्हिएतनाम रेकॉर्ड असोसिएशनचे अध्यक्ष आणि व्हिएतनाम देशाच्या गृह विभागाचे माजी उप मंत्री श्री थांग व्हॅन फुक यांनी  डॉ दीक्षित यांचा सत्कार केला. डॉ दीक्षित यांनी या सत्काराकरिता नागपुरकरांना धन्यवाद दिलेत. महा मेट्रो नागपूर प्रकल्पाला सातत्याने समर्थन दिल्याने माह मेट्रोने इथवर मजल मारल्याचे ते म्हणाले.




हे सर्व विदित आहे कि नागपूर ला १० जुलै २०२२ रोजी झालेल्या एका जंगी सोहळ्यात केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी यांनी आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सचे प्रशस्ती पत्र दिले होते. आशिया खंडातील `एकाच पिलरवर उभारलेले उड्डाण पुलासह सर्वात लांब फ्लाय ओव्हर' आणि `डबल डेकर व्हाया डक्ट वर सर्वाधिक मेट्रो स्टेशन' - या दोन श्रेणींकरता श्री गडकरी यांनी डॉ दीक्षित यांचा सत्कार केला होता.

वर्धा मार्गावरील डबल डेकर/व्हाया डक्ट आणि त्याच मार्गावरील छत्रपती चौक, जय प्रकाश नगर आणि उज्वल नगर मेट्रो स्टेशन - या ३ मेट्रो स्टेशनच्या बांधकामाकरता आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सचे प्रशस्ती पत्र मिळाले होते. या प्रमाणे दोन विविध श्रेणींमध्ये महा मेट्रोला दोन प्रतिष्ठित पुरस्कारांचे प्रशस्ती पत्र प्राप्त झाले होते.

तसेच १५ जुलै २०२२ रोजी इंडियन इन्स्टिट्यूशन ऑफ ब्रिज इंजिनियर्स तर्फे मुंबई येथे झालेल्या एका कार्यक्रमात डॉ दीक्षित यांना `स्पेशल जीवन गौरव पुरस्कार' प्राप्त झाले होते. पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात भरीव कामगिरी केल्या बद्दल डॉ दीक्षित यांचा त्या कार्यक्रमात सत्कार झाला होता.

महा मेट्रोने आपल्या कामात सातत्य आणि उकृष्टता कायम केली आहे. म्हणून आजवर अनेक पुरस्कार आणि सन्मान महा मेट्रोला मिळाले आहेत. महा मेट्रोचा प्रगतीचा आलेख बघता भविष्यात नवीन विक्रम येत्या काळात देखील प्रस्थापित होणार यात शंका नाही.

व्यवस्थापकीय संचालक डॉ दीक्षित या मोजक्या निमंत्रितांपैकी होते. `वन ब्लड, वन वर्ल्ड' हि या कार्यक्रमाची संकल्पना होती.